उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर यांच्या अधिपत्याखालील जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, कोल्हापूर येथील ०८ अस्थाई पदांना मुदतवाढ देणेबाबत

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः अपदे-२०१९/प्र.क्र.१३४/आरोग्य-४
१० वा मजला, संकुल इमारत,
गो.ते. रुग्णालय आवार, मुंबई-४०० ००१.
तारीख: २८ मे, २०१९.

वाचा

1) **शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांकः पदनि-२०१७/प्र.क्र.४०(भाग-२)/आरोग्य-३, दि.२३.०५.२०१८**
2) **शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांकः अपदे-२०१८/प्र.क्र.२३४/आरोग्य-४, दि.१.११.२०१८**
3) **शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक : पदनि-२०१ ६/प्र.क्र.८/१६/आपुक, दि.२१.०२.२०१९**
4) **सहसंचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर), मुंबई यांचे पत्र क्रमांकः संआसे/कक्ष-३/टे-१२/जिशचि,कोल्हापूरकार्यालय/अपदे/सन १९-२०/६३२५-२६/१९, दि.१५.०५.२०१९.**

शासन निर्णय

उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर यांच्या अधिपत्याखालील जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, कोल्हापूर येथील ०८ अस्थाई पदांना संदर्भाधीन क्रमांक २ येथील दि.१.११.२०१८ च्या शासन निर्णयान्वये दि.१.१०.२०१८ ते दि.२८.०२.२०१९ या कालावधीकरीता मुदतवाढ देण्यात आली आहे.

२. या शासन निर्णयान्वये उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर यांच्या अधिपत्याखालील जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, कोल्हापूर येथील यासोबत जोडलेल्या विवरणपत्र “अ” मध्ये नमूद केलेल्या ८ अस्थाई पदांना खालील अटींच्या अधीन राहून दि.१.०३.२०१९ ते दि.३०.०९.२०१९ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात येत आहे.

1) उपरोक्त पदांपैकी कोणतेही पद ६ महिन्यापेक्षा जास्त काळ रिक्त नाही व ज्या कारणांसाठी पदे मंजूर केली आहेत, त्या अटी व शर्तीचे पालन करण्यात आले आहे.
2) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक-पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.२१.०२.२०१९ नुसार विहित करण्यात आलेल्या अटी व शर्तीचे कटाक्षाने पालन करण्यात यावे व त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. त्याचप्रमाणे कार्यालयाचा पदविषयक सुधारित आकृतिबंध उच्चस्तरीय समितीकडून अंतिमत: मान्य करुन घेण्याबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.
3) विहीत मुदतीत पदांच्या आढाव्याची कार्यवाही पूर्ण न झाल्यास अस्थायी पदांना त्या पुढील कालावधीसाठी मुदतवाढ न मिळाल्यास व त्यामुळे अधिकारी / कर्मचारी यांच्या वेतन व भत्ताचा

प्रश्न निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांची राहील.

३. सदर पदांवरील होणारा खर्च, मागणी क्रमांक.आर-१, मुख्य लेखाशीर्ष “२२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०१- नागरीक आरोग्य सेवा-विषम चिकित्सा, ११० - रुग्णालये व दवाखाने, ११०-२- मुफसल क्षेत्रातील अध्यापनेत्तर शासकीय रुग्णालये (२२१० ०१४६)” या लेखाशिर्षाखालील सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता मंजुर झालेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.२१.०२.२०१९ अन्वये प्रशासकीय विभाग प्रमुखांना प्रदान केलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५२८११०३२३९२१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pradip M Balkavde

Digitally signed by Pradip M Balkavde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8db6aab31faca2f1a89698a28c94703436c07cda664672d20607766dc59d345b, serialNumber=ed0fa40788bb5c0d7f76b869fa2e5835af215c6a80eae8f70eaf87b0cf68d63f, cn=Pradip M Balkavde
Date: 2019.05.28 11:35:16 +05'30'

(प्र.मो.बलकवडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई
२. सहसंचालक आरोग्य सेवा, रुग्णालये, (राज्यस्तर)मुंबई.
३. उपसंचालक, आरोग्य सेवा कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर.
४. महालेखापाल, १/२,महाराष्ट्र (लेखा व लेखा परिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
५. वैद्यकीय अधिक्षक, इंदिरा गांधी सामान्य रुग्णालय, इचलकरंजी, कोल्हापूर.
६. जिल्हा कोषागार अधिकारी, कोल्हापूर.
७. वित्त विभाग (व्यय-१३, अर्थसंकल्प-१९), मंत्रालय, मुंबई.
८. अवर सचिव (सेवा-२/ सेवा-३/ सेवा-५ /अर्थसंकल्प), सा.आ.वि., मंत्रालय, मुंबई.
९. निवडनस्ती (आरोग्य- ४).

विवरणपत्र -"अ"

अ.क्र.	अस्थाई पदे प्रथमता ज्या शा.निर्णयाने निर्माण केली तो शा.नि.क्र.व दि.	पदनाम	पद संख्या	वेतन श्रेणी (पूर्ण रुपयात)	ज्या शासकिय आदेशान्वये अस्थाई पदे पुढे चालू ठेवली तो शा.नि.क्र.व दिनांक.	ज्या दिनांकापासून पदे चालू ठेवण्याची आहेत तो दिनांक.	लेखा शिर्ष पूर्ण	पदे पुढे चालू ठेवण्याचे आवश्यक ते स्पष्टीकरण
१	२	३	४	५	६	७	८	९
१	शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक./पदनि-२०१७/प्र.क्र. ४०(भाग-२)/आरोग्य ३. दिनांक - २३/०५/२०१८.	जिल्हा शल्यचिकित्सक, वर्ग -१	१	१५६००-३९१०० ग्रेड पे -६६००	शानस निर्णय क्र. अपदे-२०१८/प्र.क्र. २३४/आरोग्य -४/दिनांक ०१/११/२०१८.	०१/०३/२०१९ पासून पुढे ते २९/०२/२०२०	२२१० वैद्यकिय व सार्वजनिक आरोग्य ०१ नागरी आरोग्यसेवा- विषम चिकित्सा ११० - रुग्णालये व दवाखाने ११०-२ मुफसल क्षेत्रातील व दवाखाने (०१)(०१) - मुफसल क्षेत्रातील अध्यापनेतर शासकीय रुग्णालये (२२१००१४६)	शासन निर्णयाने नव्याने स्थापन करणेत आलेल्या व श्रेणीवर्धन केलेल्या आरोग्य संस्था व कार्यालयाकरीता पदनिर्मिती करणेत आलेली आहे.
२		निवासी वैद्यकीय अधिकारी, वर्ग- १ (बाहयसंपर्क)	१	१५६००-३९१०० ग्रेड पे -६६००				
३		प्रशासकिय अधिकारी	१	९३००-३४८०० ग्रेड पे ४४००				
		आरोग्य परिचारीका	१	९३००-३४८०० ग्रेड पे ४३००				
		कार्यालयीन अधिक्षक	१	९३००-३४८०० ग्रेड पे ४३००				
		लेखापाल/सहाय्यक अधिक्षक	१	९३००-३४८०० ग्रेड पे ४२००				
		सांख्यिकी अन्वेषक	१	९३००-३४८०० ग्रेड पे ४२००				
		वरिष्ठ लिपिक	१	५२००-२०२०० ग्रेड पे २४००				
		एकूण	८					